९८

# प्रसिध्दीपत्रक

मागील काही दिवसांपासून व्हॉटसअॅप वर राज्य उत्पादन शुल्क विभागाबाबत मद्य सेवन परवान्यावरील मद्य बाळगण्याची क्षमता व विशेष कार्यक्रमाकरिता आवश्यक असलेल्या एक दिवसीय अनुज्ञप्तीबाबत तरतुदी सर्व संबंधितांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

राज्यात महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ कलम ११ नुसार ज्या व्यक्तीकडे या कायद्यान्वये दिलेला परवाना असल्यास अशी व्यक्ती मद्य बाळगणे, मद्याची खरेदी व वाहतुक करु शकतो. याकरिता परवाना नमुना " एफएल-एक्ससी " धारण करणे आवश्यक आहे. सदर परवाना मद्य सेवन, खरेदी, वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येतो. मद्य बाळगण्यासंदर्भात प्रत्येक मद्य प्रकारासाठी परिमाण वेगवेगळे आहेत.

विशेष कार्यक्रमासाठी एकदिवशीय अनुज्ञप्ती नमुना "एफएल-४अे" ही नियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. सदर अनुज्ञप्ती मद्यविक्री परवानगी नसलेल्या सार्वजनिक ठिकाणी मद्यविक्री करावयाची असल्यास तात्पुरत्या स्वरुपात देण्याची तरतुद आहे. या विशेष कार्यक्रमाच्या एकदिवसीय अनुज्ञप्तीसाठी किती व्यक्ती उपस्थित असाव्यात याबाबत कोणतेही बंधन नसून केवळ व्यावसायिक कार्यक्रमासाठी उदा. आयपीएल सारखे क्रिडा प्रकार अथवा मोठे मनोरंजनात्मक कार्यक्रम यासाठी अनुज्ञप्ती शुल्क अधिक घेण्यात येते.

मद्य सेवन करण्याकरिता परवाना आवश्यक आहे व परवाना असणाऱ्या व्यक्तीस खाजगी ठिकाणी मद्य सेवन करण्यास अथवा बाळगण्यासाठी इतर कोणत्याही अनुज्ञप्तीची आवश्यकता नाही.

सदर परवाने प्राप्त करुन घेण्याची सोय राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ऑनलाईन पोर्टलवर तसेच संकेतस्थळावर सशुल्क सेवा उपलब्ध आहे.या संदर्भातील सविस्तर माहितीसाठी इच्छुकांनी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळास/पोर्टलला भेट द्यावी.

https://stateexcise.maharashtra.gov.in

https://exciseservices.mahaonline.gov.in